# जाहिर नोटिस

जाहिर नोटिस देण्यात येते की, मौजे बाजारपेठ(पाली) ता.जि.रत्नागिरी येथील स.नंबर 65 हि.नं.0 क्षेत्र 0.47.00 हे.आर पैकी 00.15.00 हे.आर क्षेत्राची पाली पंचक्रोशी बौध्द समाज मंडळ यांनी दिनांक 26/02/2013चे अर्जान्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधणेसाठी मागणी केली आहे. त्यानुसार त्यांना सदरचे क्षेत्र वाटप करावयाचे आहे. शासन महसूल व वन विभाग यांजकडील शासन निर्णय क्रमांक/जमीन-2018/प्र.क्र. 38/ज-1 दिनांक 25 जूलै, 2019 मधील निर्देशानुसार यादवारे इच्छुक व्यक्तींची/संस्थांची जमीन मागणीबाबत आवेदने मागविणेत येत आहेत. तरी आवेदने सादर करावयाची असल्यास दिनांक 30/06/2020 पर्यंत या कार्यालयाकडे सादर करावीत. तदनंतर प्राप्त होणारी आवेदने विचारात घेण्यात येणार नाहीत.

सहि/-

(बाबासाहेब बेलदार)

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

दिनांक :- 18/5/2020

ठिकाणः- रत्नागिरी

प्रतः- 1. उपविभागीय अधिकारी (सर्व) यांजकडे नोटीस फलकावर प्रसिध्द करुन अहवाल सादर करणेकामी.

2.तहसीलदार सर्व यांजकडे नोटीस फलकावर प्रसिध्द करुन अहवाल सादर करणेकामी.

3. धर्मादाय आयुक्त, रत्नागिरी यांजकडे नोटीस फलकावर प्रसिध्द करुन अहवाल सादर करणेकामी.

4. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, यांजकडे जिल्हाधिकारी यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

5. सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण कार्यालय,कुवारबाव यांजकडे नोटीस फलकावर प्रसिध्दीसाठी.

तहसीलदार महसूल

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी